नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 21/01/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर मौजा आदर्श नगर साई मंदीर उमरेड येथे दिनांक 18/01/2021 ते दिनांक 19/01/2021 चे रात्री दरम्यान फिर्यादी नामे– ग. भा. ममता जयकृष्ण पाटील, वय 36 वर्ष रा आदर्श नगर साई मंदीर उमरेड या आपले घराला कुलूप लावुन गडचिरोली येथे गेल्या असता होत्या. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे कुलूप तोडुन बेडरूम मधील लोखंडी आलमारी मधुन सोन्याचे दागीणे कि. 20,000/–रू., नगदी 20,000/– रू व स्टेट बॅक ऑफ इंडीयाचे पासबुक असा एकुण किंमती 40,000/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला. तसेच फिर्यादीचे शेजारी राहणारे केशव बाबुळकर यांचे सुद्धा घराचे अज्ञात आरोपीने कुलूप तोडुन चोरी करण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380, 511 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा आंनद धात्रक 9545355470 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 7 कि.मी. अंतरावरील मौजा मौदी शिवार मौदी ते पवनी रोड येथे दिनांक 07/01/2021 चे 19:00 वा. ते 19.30 वा. दरम्यान एम.एच. 40/सी.बी. 9541 क्रमांकाच्या मोटरसायकलचा चालक आरोपी नामे– राजेश जयवंत पवार, वय 35 वर्ष, रा. मौदी याने आपल्या ताब्यातील मोटरसायकलवर टीबलसीट बसवून त्याने आपली मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने त्याचे मोटरसायकलवरचे नियंत्रण सुटून गाडीवरील तोल गेल्याने मोटरसायकल वर मागे बसलेले राजेन्द्र हरी ईनवाते व अशोक कोरचे हे मोटरसायकल वरून डांबरी रोडवर फेकल्या गेल्याने रोडनी जाणाऱ्या अज्ञात ट्रॅक्टर ट्रालीचे मागचे चाक यातील मृतक– राजेन्द्र हरी ईनवाते यांचे उजव्या पायावरुन गेल्याने उपचारा दरम्यान त्यांचा मेयो हॉस्पीटल नागपूर येथे मृत्यु झाला. तसेच गाडीवरील अशोक दिवानजी कोरचे यांचे जखमी होन्यास आरोपी मोटरसायकल चालक हा कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 128/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री प्रवीण बोरकुटे 9845667223 हे करीत आहे.

2) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 5 कि.मी. अंतरावरील मौजा चिखली रोड येथे दिनांक 19/01/2021 चे 21:15 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रविन प्रभाकर निखारे, वय 23 वर्ष, रा. वार्ड क्र 5 भिवापुर, जि.नागपुर व त्याचे मित्र हे फिर्यादीचे मोटरसायकलने तसेच मृतक– आकाश परसराम सोनवने व त्याचा मित्र हे एमएच– 40/बीवाय 8425 क्रमांकाच्या मोटरसायकलने भिवापुर वरुन गणेश धोटे रा. चिखली यांचे कडे उधारीचे पैसे आणने करीता आप आपले मोटरसायकलने चिखली कडे जात होते. त्यादरम्यान अज्ञात ट्रैक्टरचे चालक आरोपीने त्याचे ताब्यातील ट्रैक्टर भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन एमएच– 40/बीवाय– 8425 क्रमांकाच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकलचा चालक आकाश सोनवने(मृतक) याचे मरणास व त्याचा मित्र सुमित दिलीप पवार यास जखमी होणेस कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापूर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि भस्मे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर